महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र.मआ/साप्रवि/आस्था-४/२८८३
दि. ०९/०६/२०२१

**-: कार्यालयीन आदेश :-**

विषय :- पुणे महानगरपालिका सेवेतील अधिकारी / कर्मचारी यांचे नामनिर्देशन व पदोन्नतीच्या प्रयोजनार्थ निवडसूची तयार करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या खातेनिहाय बढती समितीमधील मागासवर्गीयांचे प्रतिनिधी यांचे नेमणूकीबाबत.

संदर्भ :- महापालिका आयुक्त कार्यालय जा.क्र.मआ/साप्रवि/आस्था/३२४१ दि.१३/०९/२०१७

पुणे महानगरपालिका आस्थापनेवरील वर्ग १ ते ४ मधील अधिकारी / कर्मचारी यांचे नामनिर्देशन व पदोन्नतीने नियुक्तीचे प्रयोजनार्थ निवडसूची तयार करण्यासाठी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५४ (१) मधील तरतुदीनुसार मा. खातेनिहाय बढतीसमितीची रचना संदर्भांकित कार्यालयीन आदेशान्वये करण्यात आलेली आहे.

उपरोक्त मा. खातेनिहाय बढती समितीमध्ये मागासवर्गीयांचे प्रतिनिधीत्व करणेसाठी नामनिर्देशित केलेले अधिकारी यांचाही समावेश करणे आवश्यक आहे. सदर पदावर मागासवर्गीयांचे प्रतिनिधीत्व करणेसाठी सदस्य म्हणून कामकाज करीत असलेले श्री. मदन आढारी, मुख्य अभियंता (वाहतूक नियोजन) श्रेणी – १ हे दि.३०/०६/२०२१ रोजी पुणे महानगरपालिका सेवेतून वयोपरत्वे सेवानिवृत्त होत आहेत. त्यांचे रिक्त होणाऱ्या पदावर श्री. ---भोसेकर जयंत श्यामसुंदर--- हुद्दा ---उप आयुक्त--- श्रेणी – १ यांची मा.खातेनिहाय बढती समितीमध्ये "सदस्य (मागासवर्गीयांचे प्रतिनिधी) " म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

तरी, उपरोक्त नियुक्तीचे अनुषंगाने संबंधित खातेप्रमुख/विभाग प्रमुख यांनी जरूर ती पुढील तजविज करावी.

(विक्रम कुमार)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका